# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **Email Id :-** sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१६/आस्था/से.नि.कंत्राटी भरती/४४४/२०२१
दिनांक - ०५/०२/२०२१

**प्रती,**
**मा.सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे**

विषय :- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे मधून कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरणेबाबतची जाहिरात आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणे बाबत........

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या आस्थापनेवर,महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण – २७१५ /प्र.क्र.१००/१३ दिनानक .१७.१२.२०१६ मधील नमूद तरतुदी , अटी व शर्ती ,नुसार सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी , यांचे मधून कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरणेबाबत जाहिरातिचा नमुना या पत्र सोबत जोडण्यात आलेला आहे.

सदर जाहिरात आपल्या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेबाबत विनंती आहे.

०५/०२/२०२१

सोबत - जाहिरात नमुना सॉफ्ट व हार्ड कॉपी

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे

# कंत्राटी पद भरतीची जाहिरात

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं - (०२०) २६०५०६४१ Email id :- sceapune@gmail.com

---

सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे या स्वतंत्र व स्वायत्त प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असून प्राधिकरणात कंत्राटी पध्दतीने भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील, निर्णय क्रमांक :संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | संख्या | या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले पात्र | अनुज्ञेय पारिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| १ | सह सहकारी निवडणुक आयुक्त | १ | एस-२३ ( ६७७००-२०८७००) | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं. संकीर्ण –२७१५/ प्रक्र. १००/ १३, दि. १७.१२.२०१६ मधील अटी/शर्ती लागू राहतील,या निर्णयातील परिशीष्ट **अ** मध्ये नमुद प्रमाणे **पारिश्रमिक** देय राहील. |
| २ | उप सहकारी निवडणूक आयुक्त | १ | एस -२० (५६१००-१७७५००) | |
| ३ | सहाय्यक सहकारी निवडणूक आयुक्त | ३ | एस -१५ (४१८००-१३२३००) | |
| ४ | उच्च श्रेणी लघुलेखक | १ | एस -१५ (४१८००-१३२३००) | |
| ५ | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | ३ | एस-१४ (३८६००-१२२८००) | |
| ६ | विधी सल्लागार | १ | एस-२३(६७७००-२०८७००) अथवा विधीची पदव्युत्तर पदवी, आणि प्रत्यक्ष वकीलीचा १० वर्षाचा अनुभव | पहिल्या वर्षी दरमहा रु.५०,०००/- इतके एकत्रित मानधन तद्नंतर प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे मानधनात वाढ |

विस्तृत जाहिरात,अर्जाचा विहित नमुना, अटी व शर्ती सहकार आयुक्त व निबंधक यांचे वेबसाईट http://www.sahakarayuakta.com वर देण्यात आला आहे.अर्ज सादर करण्याच्या कालावधी **दिनांक १५.०२.२०२१ ते दि.०१.०३.२०२१ अंतिम पर्यंत राहील.**

**सही/-**

**सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण म.रा.पुणे**

### अटी व शर्ती

१. अर्जदारांनी त्यांचे अर्ज मा. सहकार आयुक्त पुणे यांच्या http://www.sahakarayuakta.com या वेबसाईट वरून विहित नमुना अर्ज डाउनलोड (dowan load) करून घेऊन ते सदस्य सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, ५बी.जे.रोड, तळ मजला, पुणे ४११००१ या पत्त्यावर पाठवावेत.किंवा प्राधिकरणाच्या sceapune@gmail.com या ई-मेल वर अर्ज करावेत.

२. अर्जदारांनी अर्जात त्यांची जन्मतारीख, सेवानिवृत्तीची तारीख, सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान आदेशाची Pension Payment Order (PPO) छायांकित सत्य प्रत, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी क्रमांक इत्यादी बाबी ठळक व अचुक नमुद कराव्यात.

३. (i) अ.क्र.**१, २ व ३** पदांच्या बाबत प्रस्तावित वेतन श्रेणीतून किमान ३ वर्षाचा त्या पदावर प्रत्यक्ष कामकाज केल्याचा अनुभव असणाऱ्या आणि फक्त सहकार विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांनी आवेदन पत्र सादर करावे .

(ii) अ.क्र.**६** पदाबाबत प्रस्तावित वेतन श्रेणीतून, सेवानिवृत्त झालेले व सदर पदाचा ३ वर्षाचा अनुभव असलेले अथवा विधीची पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या आणि प्रत्यक्ष वकिलीचा १० वर्षाचा अनुभव असलेल्यांनी आवेदन पत्र सादर करावे.विधी अधिकारी यांना पहिल्या वर्षी दरमहा रु.५०,०००/- इतके एकत्रित मानधन अनुज्ञेय असेल व त्यानंतर प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे मानधनात वाढ करण्यात यईल.

(iii) अ.क्र. **४ व ५** पदांच्या बाबत उपरोक्त वेतन श्रेणीतून किमान ३ वर्षाचा त्या पदावर प्रत्यक्ष कामकाज केल्याचा अनुभव असणाऱ्यामधून सेवानिवृत्त झालेल्या शासनाच्या कोणत्याही विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी आवेदन पत्र सादर करावे.

(iv) **करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा :-** सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्तीस गुणवत्ता मुल्य निर्धारण अहवाल / निकषावर आधारित कामकाजाच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता प्राधिकरणास आवशक्यकता असेल तर दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(v) **मासिक पारिश्रमिक व भत्ते :-** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 17/12/2016 मधील परिशिष्ट **अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियुक्तिच्या दिनांकास मिळत असलेल्या महागाई भत्त्यासह निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. **आणि** एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तिच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त 3 वर्षे) कायम राहील.